# <u>जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग अहिल्यानगर</u>

# <u>बांधकाम विभागामध्ये विविध योजनांचे</u>

# <u>नियोजन व आराखडे तयार करण्याची कार्यपध्दती</u>

# जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग अहमदनगर

बांधकाम विभागामध्ये विविध योजनांचे नियोजन व आराखडा तयार करण्याची कार्यपध्दती

**१) जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) रस्ते लेखाशिर्ष ३०५४ व ५०५४ -**

जिल्हा वार्षीक योजना सन सर्वसाधारण अंतर्गत अर्थसंकल्पीत झालेल्या निधीच्या अनुषंगाने निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात येतो. सदरच्या योजनेसाठी रस्त्यांच्या लांबी, मागणी व आवश्यकतेनुसार जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त होतो. सदर योजनेमधून रस्ते विकास योजना अंतर्गत समावेश असलेल्या रस्त्यावर खडीकरण, डांबरीकरण, छोंटे पूल व मो-या बांधणे इ. कामे हाती घेण्यात येतात. उपविभागांकडून प्रस्ताव प्राप्त झाले नंतर शासन निर्णय क्रमांक जिवायो१००७/प्रक्र३९/का१४४४ दि. १६ फेब्रु.२००८ व शासन निर्णय क्रमांक जिवायो२०१५/प्रक्र११/पंरा८ दि. ३.०९.२०१६ नुसार मंजूर नियतव्ययाचे दिड पट रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेनंतर सक्षम प्राधिकारा मार्फत (उपअभियंता – १ ते ५ लक्ष, कार्यकारी अभियंता – ५ ते १००.०० लक्ष मा.अधिक्षक अभियंता – १००.०० लक्ष, वरील) तांत्रीक मान्यता दिली जाते. तांत्रिक मान्यता प्राप्त झाले नंतर निविदा प्रक्रिया करुन कामे हाती घेतली जातात. सदरच्या योजनेचा प्राप्त होणारा निधी दोन वर्षाच्या मर्यादित कालावधीत खर्च करणे बंधनकारक आहे.

२) **आदिवासी उपयोजना रस्ते (टी.एस.पी.) –**

आदिवासी उपयोजने अंतर्गत अहिल्यानगर जिल्हया मध्ये अकोले तालुक्यातील काही भाग आदिवासी असून सदरच्या भागातील रस्त्यांच्या व मो-या बांधकामासाठी शासनाकडून निधी प्राप्त होतो.

प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेनंतर सक्षम प्राधिकारामार्फत (उपअभियंता-१ ते ५.०० लक्ष कार्यकारी अभियंता- ५ ते १००.०० लक्ष मा.अधिक्षक अभियंता- १००.०० लक्ष वरील ) तांत्रीक मान्यता दिली जाते.

तांत्रिक मान्यता प्राप्त झाले नंतर निविदा प्रक्रिया करुन कामे हाती घेतली जातात. सदरच्या योजनेचा प्राप्त होणारा निधी दोन वर्षाच्या मर्यादित कालावधीत खर्च करणे बंधनकारक आहे.

३) **रस्ते दुरुस्ती कार्यक्रम –**

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत इतर जिल्हा मार्ग (ओ.डी.आर.) व ग्रामीण मार्ग (व्ही.आर.) हे दोन प्रकारचे रस्ते येतात. त्यांची देखभाल व दुरूस्ती जि.प. मार्फत करण्यात येते. रस्ते विकास योजनेतील (नकाशातील/) रस्त्यांचीच कामे याद्वारे घेतली जातात. शासनाच्या रस्ते

विकास आराखडा यात समाविष्ट असलेल्या रस्त्यांची देखभाल-दुरुस्ती जि.प. मार्फत केली जाते. रस्ते दुरूस्तीलचे ढोबळ मानाने दोन प्रकार आहेत.

१) रस्ते सर्वसाधारण/किरकोळ/नियमित दुरुस्ती
२) रस्ते विशेष दुरुस्ती

१) **रस्ते सर्वसाधारण दुरूस्ती (गट अ)** - यामध्ये खालील प्रकारची कामे घेता येतात.
अ) डांबरी रस्ता पृष्ठभागावरील खडडे भरणे.
ब) खडीचा रस्ता पृष्ठभागावरील खडडे भरणे.
क) उखडलेले कठडे व पॅरापेट इ.ची पुनर्बांधणी करणे.
ड) किरकोळ स्वरूपात वाहून गेलेल्या भरावयाची पूनस्थापना करणे.

२) **रस्ते विशेष दुरुस्ती (गट ब-क)** - रस्त्याचा दर्जा टिकविण्याची/सुधारण्याची कामे याद्वारे केली जातात. उदा. रस्त्यांचे मजबूतीकरण करणे, डांबरी रस्त्याचे नुतनीकरण करणे, खडी पृष्ठभागाचे नूतनीकरण करणे ही कामे गट ब मध्ये येतात. गट क मध्ये विशेष प्रयोजनाची कामे उदा. कमकुवत पूलांची दुरूस्ती/मजबूतीकरण करणे, लहान मो-यांची बांधकामे व सुधारणा करणे इ. कामे घेतली जातात.

**योजना अंमलबजावणीची कार्यपद्दती**

रस्ते नियमित व विशेष दुरूस्ती- सदर रस्ते दुरुस्तीचा कार्यक्रम ग्रामविकास विभागामार्फत मंजूर केला जातो. शासन निर्णय क्र. जिपर- २०१२/प्र.क्र.११८/पंरां-८ दि.१०.०९.२०१२ अन्वये रस्ते दुरूस्ती व परिक्षण कार्यक्रम विहित नमुना १ ते ६ मध्ये तयार शासनाकडे सादर केला जातो. शासनाकडून मंजुरी व अनुदान उपलब्ध झाल्यानंतर रस्ते देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेतली जातात.

**४) जिल्हा परिषद सेस निधी अनुदान**

जिल्हा परिषद सेस हा जि.प. चा स्वनिधी असून, त्याचे उत्पन्न जिल्हा परिषदेला विविध मार्गांनी प्राप्त होते. या निधीची जि.प. वार्षिक अंदाजपत्रक दरवर्षी तरतूद/नियोजन केले जाते. त्यानुसार जि.प. च्या विविध विभागांना यातील तरतुदीनुसार कामे घेता येतात. बांधकाम विभागाकडील जि.प.च्या सेस निधीमधून खालील प्रकारची कामे घेता येतात.

सदर निधी त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. शासनाच्या दि. /४/२०११ च्या परिपत्रकानूसार, उपलब्ध निधीतून दायित्वाची कामे वजा जाता, शिल्लक रकमेच्या दीडपट रकमेची कामे हाती घेता येतात.

१) रस्ते व मो-या देखभाल दुरूस्ती
२) तीर्थक्षेत्र व पर्यटन विकास कामे

३) दहन-दफनभूमी व्यवस्थापन
४) दळणवळणासाठी नविन होडया, नावे खरेदी करणे.
५) पं.स.कार्यालय, निवासस्थान, जि.प.विश्रामगृह देखभाल-दुरूस्ती
६) जि.प. जागेवरील अतिक्रमणे काढणे/कुंपण करणे इ.

**<u>योजना अंमलबजावणीची कार्यपद्दती</u>**

जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, जि.प.सदस्य, सभापती पं.स. यांनी सुचविलेल्या वरील प्रकारच्या विविध कामांना उपलब्ध अनुदानानुसार मा. अध्यक्ष जि.प. अ.नगर हे अंतिम मंजूरी देतात. त्यानुसार अंदाजपत्रके, निविदा इ. प्रक्रीयाद्वारे ही कामे पुर्ण केली जातात. सदर कामांबाबतचा पूर्ण अधिकार जिल्हा परिषदेला आहे. इतर कोणत्याही योजनेत घेता न येणारी, योजनाबाहय रस्त्यांची कामे जि.प.सेस निधीमधून घेतली जातात.

जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या राज्य, केंद्र शासनाच्या विविध योजनाची प्रशासकीय मंजूरी व अनूदान उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही संबंधित विभागामार्फत केली जाते (उदा. शाळा खोल्या बांधकाम, अंगणवाडी बांधकामे, प्राथमिक आरोग्य केंद्र उपकेंद्र बांधकामे, पशुवैदयकीय दवाखाने इ.) व पुढील बांधकामाची अंमलबजावणी उदा. अंदाजपत्रके तयार करणे, तांत्रिक मंजूरी देणे, निविदा प्रक्रिया करणे, कामे सुरू करून ती पूर्ण करणे व आर्थिक-भौतिक उददीष्ट साध्य करणे इ. कार्यवाही बांधकाम विभागामार्फत केली जाते.

| अ.क्र. | योजनेचे नाव | प्रशासकीय मंजूरी देणारा विभाग |
|---|---|---|
| १ | क वर्ग तीर्थक्षेत्र विकास योजना | ग्रामपंचायत विभाग |
| २ | प्राथमिक आरोग्य कंद्र /उपकेंद्र बांधकाम व दुरूस्ती | आरोग्य विभाग |
| ३ | पशुवैदयकीय दवाखाना बांधकामे व दूरूस्ती | पशुसंवर्धन विभाग |
| ४ | शाळा खोल्या बांधकामे व दुरूस्ती | प्राथमिक शिक्षण विभाग |
| ५ | स्थानिक विकास कार्यक्रम | जिल्हा नियोजन विभाग |
| ६ | डोंगरी विकास कार्यक्रम | जिल्हा नियोजन विभाग |
| ७ | ठक्कर बाप्पा आदिवासी विकास कार्यक्रम | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प राजूर |
| ८ | अंगणवाडी बांधकामे | महिला व बालकल्याण विभाग |